# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.05.2026** **वार:शुक्रवार**

1. खरीप हंगामसाठी राज्यात बियाण्यांचा पुरेसा साठा; शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सुरळीत करण्यावर भर असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
2. सायप्रसच्या उद्योग समूहांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी-मुख्यमंत्र्यांचं आवाहन; भारत आणि सायप्रसच्या उद्योग समूहांमध्ये सहा सामंजस्य करार
3. डॉ. राजनीश कामत यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती आणि
4. पुण्यातील गिरिप्रेमी संस्थेच्या सदस्यांकडून माऊंट एव्हरेस्ट शिखर सर

**<u>खरीप हंगाम बैठक</u>**

यंदाचा खरीप हंगाम एल निनो, बदलतं हवामान आणि जागतिक खत परिस्थितीमुळे आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे; मात्र शेतकऱ्यांना वेळेवर कर्जपुरवठा, योग्य खत व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आव्हानांवर मात करून खरीप हंगाम यशस्वीपणे पार पाडू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीनंतर ते काल पत्रकारांशी बोलत होते. खरीप हंगामवारील संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकार सज्ज असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यात बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांना वेळेवर कर्जपुरवठा, जलसंधारणाची कामे आणि कृषी क्षेत्रातील डिजिटायझेशन यावर विशेष भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार यावर्षी राज्यात सरासरीच्या केवळ 88 टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे, यंदा मान्सूनचा पाऊस उतरत्या क्रमाने होईल, असा प्राथमिक अंदाज आहे. त्या पार्श्वभूमीवर जलयुक्त शिवार अभियानाची सर्व कामं अत्यंत जलदगतीनं पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी कोणत्याही प्रकारच्या 'सिबील स्कोअर'ची मागणी केली जाऊ नये आणि सिबिलकरता शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, अशी सक्त ताकीद राष्ट्रीयकृत बँकांना दिली असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. 30 जूनपूर्वी कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, जेणेकरून शेतकरी पुढच्या हंगामासाठी पात्र ठरतील. असंही ते म्हणाले.

खरीप हंगामासाठी राज्यात बियाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. प्रमाणित बियाणांसाठी शेतकऱ्यांनी 'साथी' पोर्टलवरील बियाणेच विकत घ्यावीत, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं. ते म्हणाले.....

**यामध्ये सोयाबीन कापूस मका, भात, तूर, बाजरी इत्यादी बियाण्यांचा अगदी पुरेसा साठा आहे आणि आपला हा प्रयत्न आहे की सगळं बियाणं हे प्रमाणित बियाणं असावं या दृष्टीनं साथी पोर्टल आपण तयार केल आहे साथी पोर्टलवर रजिस्टर्ड बियाणे विकत घेण्यात यावं अशा पद्धतीचा आपण शेतकऱ्यांना त्या ठिकाणी आग्रह करतो आहोत जेणेकरून त्यांची जी काही फसवणूक आहे ती फसवणूक या ठिकाणी होणार नाही आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य अशा प्रकारचं बियाणं त्या ठिकाणी मिळेल.**

**<u>सायप्रस करार</u>**

सायप्रसच्या उद्योग समूहांनी महाराष्ट्रात येऊन गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत आयोजित सायप्रस-भारत बिझनेस फोरममध्ये ते काल बोलत होते. सायप्रस प्रजासत्ताकाचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिडेस यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र हे 660 अब्ज डॉलर्स अर्थव्यवस्थेचं राज्य असून देशाच्या औद्योगिक उत्पादनात सुमारे 30 टक्के, तर परकीय गुंतवणुकीत 40 टक्के वाटा राज्याचा आहे. ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र 93 गिगावॅट निर्मिती क्षमतेकडे वाटचाल करत आहे. त्यापैकी 52 टक्के ऊर्जा नवीकरणीय स्रोतांतून निर्माण होत आहे. तसंच आंतरराष्ट्रीय एज्यु सिटी, मेडी सिटी आणि जीसीसी सिटी सारखे जागतिक दर्जाचे प्रकल्प उभारले जात असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

भारतीय उद्योगांना केवळ युरोपातच नव्हे तर पूर्व भूमध्य सागरी, आखाती आणि उत्तर आफ्रीकेतल्या देशांची बाजारपेठ खुली करून देण्यासाठी सायप्रस साहाय्य करेल अशी ग्वाही सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिडेस यांनी यावेळी दिली. मुंबईत येत्या 1 सप्टेंबर पासून सायप्रस व्यापार केंद्र सुरु करण्याची घोषणाही त्यांनी केली. यावेळी दोन्ही देशांमधल्या उद्योगसंस्था आणि कंपन्यांमध्ये सहा सामंजस्य करार करण्यात आले.

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिडेस यांच्याशी चर्चा करणार आहेत. दोन्ही नेते परस्पर हिताच्या विविध क्षेत्रांमधील द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्याबाबत चर्चा करतील. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला पाच देशांचा यशस्वी दौरा आटोपून काल सकाळी मायदेशी परतले. या दौऱ्यामुळे हरित ऊर्जा, सेमिकंडक्टर आणि संरक्षण तंत्रज्ञान, व्यापार, गुंतवणूक अशा विविध क्षेत्रातल्या सहकार्याला चालना मिळाली आहे. मोदी यांनी संयुक्त अरब अमिरात, नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पाच देशांना भेट दिली.

**<u>राजीव गांधी पुण्यतिथी</u>**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल राज्यात सर्वत्र त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. हा दिवस दहशतवाद आणि हिसांचार विरोधी दिवस म्हणून पाळला जातो. या निमित्तानं राज्यभरातील शासकीय अस्थापनांमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी शपथ घेतली.

**<u>भारत फोरकास्ट सिस्टम करार</u>**

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं, पुण्याच्या भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेशी सामंजस्य करार केला आहे; या करारामुळे केंद्र सरकारच्या भारतीय हवामान विभागाच्या 'मिशन मौसम' अंतर्गत विकसित करण्यात आलेली स्वदेशी 'भारत फोरकास्ट सिस्टम' आता राज्याच्या निर्णय प्रक्रियेत थेट वापरली जाणार आहे. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी ही माहिती दिली आहे. 'भारत फोरकास्ट सिस्टम' या अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणालीचा वापर करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य ठरलं असून हवामान पूर्वसूचना, स्थानिक पातळीवरील तयारी आणि समन्वित प्रतिसाद यामध्ये मोठी सुधारणा होईल. असं महाजन यांनी म्हटलं आहे.

**<u>कुलगुरू</u>**

मुंबईच्या डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांची कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल आणि कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी डॉ. राजनीश कामत यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांचा कार्यकाळ गेल्या वर्षी संपल्यामुळे हे पद रिक्त होतं, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता.

**<u>एव्हरेस्ट</u>**

पुण्यातील गिरिप्रेमी संस्थेच्या सदस्यांनी आणखी एकदा माऊंट एव्हरेस्टवर चढाई पूर्ण केली असून या सर्वोच्च शिखरावर काल सकाळी तिरंगा फडकवला. विवेक शिवडे, मिहिर जाधव, अखिल काटकर या गिरीप्रेमीच्या सदस्यांना उरजेन शेरपा, लकपा शेरपा आणि लकपा शेरपा यांनी सहकार्य केलं. गिरिप्रेमीच्या सदस्यांनी आता पर्यंत चार वेळा एव्हरेस्ट शिखर यशस्वीपणे सर केलं आहे. याविषयी गिरीप्रेमीचे उमेश झिरपे यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली.....

**गिरीप्रेमी एव्हरेस्ट वीस सव्वीस या मोहिमेचा नेता एव्हरेस्टच्या बेस कॅम्प वरून आपल्याशी संवाद साधत आहे. आज सकाळी पावणे सहा वाजता गिरीप्रेमीच्या तीन गिरारकांनी जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट वरती भारताचा तिरंगा आणि महाराष्ट्राचा भगवा फडकावला. ही एक खूप आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. संपूर्ण महाराष्ट्रवासियां संपूर्ण देशवासीयांसाठी ही एक अभिमानाची गोष्ट आहे. या अत्यंत खडतर मोहिमेमध्ये या तिन्ही गिर्यारोकांनी खूप चांगली कामगिरी करून आज शिखरमात्यावरती पोहोचण्यात यश मिळवलं. या मोहिमेसाठी मदत करणाऱ्या सर्व देणगीदारांचे सर्व गिरीप्रेमींचे हितचिंतकांचे मी मनापासून आभार मानतो.**

**नीट पेपरफुटी**

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने लातूरचे बालरोगतज्ञ डॉ. मनोज शिरूरे यांना
ताब्यात घेतलं आहे. आपल्या मुलीसाठी नीट परीक्षेचा प्रश्नपत्रिका संच खरेदी केल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. या संदर्भात काही दिवसांपूर्वी सीबीआयने लातूरमधील त्यांच्या रुग्णालयात जाऊन कसून चौकशी केली होती. पुण्यातील चौकशीनंतर त्यांना सीबीआयने ताब्यात घेतलं आहे.

**अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी इथल्या सावळी विहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन उद्या संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत होणार आहे. अहिल्यानगर जिल्हयात प्रथमच कार्यान्वित होत असलेल्या या प्रकल्पामुळे जिल्हा देशातील महत्त्वाचं संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून ओळखला जाणार आहे. प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमिताने उद्या आणि परवा शिर्डीमध्ये संरक्षण साहित्याच्या उत्पादनाचं भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आल आहे. रॉकेट आणि क्षेपणास्त्र हे या प्रदर्शनाचं विशेष आकर्षण असेल.

**मनसे**

ठाण्याच्या न्यायालयानं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे आणि इतर आरोपींना काल दोषमुक्त केलं. 2008 मध्ये रेल्वे भरती परीक्षा काळात कल्याण स्थानकावर मनसेच्या काही कार्यकर्त्यांनी काही उमेदवारांना मारहाण केल्याच्या आरोपाखाली राज ठाकरे यांच्यासह आठ जणांवर खटला सुरु होता. या प्रकरणात राज ठाकरे यांनी प्रक्षोभक भाषण केल्याचा, तसंच उमेदवारांना मारहाण झाल्याचे कोणतेच आरोप सरकार पक्षाला सिद्ध करता आले नाही त्यामुळे न्यायालयानं या सर्वांची निर्दोष मुक्तता केली.

**पुलवामा आरोपी**

पुलवामा हल्ल्यातला एक आरोपी हमजा बुरहान याची काल पाकव्याप्त काश्मीरमध्ये अज्ञात व्यक्तींनी गोळ्या झाडून हत्या केली. मुजफ्फराबादमधल्या एका महाविद्यालयासमोर त्याची कार वाहतूक कोंडीत अडकली असताना दुचाकीवरुन आलेल्या दोन हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. 14 फेब्रुवारी 2019 पुलवामा इथं भारतीय लष्कराच्या ताफ्यावर लेल्या हल्ल्यात 40 सैनिकांचा मृत्यू झाला होता.

**अपघात-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात एसटी बस उलटून झालेल्या अपघातात काल तीन प्रवाशांचा मृत्यू झाला तर 33 जण जखमी झाले. मृतांमधे सात महिन्यांच्या अर्भकाचा समावेश आहे. एका वळणावर चालकाचं नियंत्रण सुटून बस कडेचा लोखंडी कठडा तोडून कोसळली. जखमींना जवळच्या रुग्णालयात नेलं, तिथंच त्यापैकी तिघांचा मृत्यू झाला.

**हवामान**

विदर्भात बहुतांश ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान वर्धा इथं 47 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.